**जाहिरात क्र.01**

# जिल्हा परिषद रत्नागिरी
## शिक्षण विभाग (प्राथमिक)
## (शालेय पोषण आहार योजना)

शालेय पोषण आहार योजनेंतर्गत जिल्हा परिषद अंतर्गत रिक्त असणारी डेटा एंट्री ऑपरेटरची पदे तात्पुरत्या स्वरुपात पुढील 11 महिन्याचे कालावधी करीता कंत्राटी पध्दतीने एकत्रित मानधनावर भरण्यात येणार आहेत. जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या शैक्षणिक व व्यावसायिक अटी पूर्ण करणा-या उमेदवारांचे अर्ज सोबत दिलेल्या विहीत नमुन्यात शिक्षण विभाग (प्राथामिक), जिल्हा परिषद रत्नागिरी येथे दिनांक 18 /07 /2018 सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत समक्ष अथवा पोस्टाने सुट्टीचे दिवस वगळून स्विकारले जातील.

| अ.क्र. | पदाचे नाव | पदाची संख्या | मासिक एकत्रित परिश्रमिक | शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता |
|---|---|---|---|---|
| 1 | डेटा एन्ट्री ऑपरेटर | तालुकास्तर- 1) दापोली- 1<br>2) खेड - 1<br>3) गुहागर -1<br>4) राजापूर-1 | रु.10932/- | 1) किमान 12 वी पास<br>2) मराठी टंकलेखन 30 श.प्र.मि.<br>3) इंग्रजी टंकलेखन 40 श.प्र.मि.<br>4) एम.एस.सी.आय.टी. किंवा केंद्र शासनाची या संदर्भातील तुल्यबल संगणकाची परिक्षा उत्तीर्ण झालेला असणे आवश्यक आहे. |

1) **वयोमर्यादा:-** दिनांक 1/1/2018 अखेर वय वर्षे किमान 18 व कमाल 35.

2) **निवड पध्दती:-**

1. आर्हता पूर्ण करणा-या उमेदवारांची मराठी टायपिंग-30 शब्द प्रति मिनिट व इंग्रजी टायपिंग-40 शब्द पतिमिनिट आणि संगणक ज्ञानाची प्रात्यक्षिक परिक्षा सर्व प्रथम घेण्यात येईल.यासाठी सर्व मिळून 100 गुण देण्यात येतील. सदर प्रात्यक्षिक परिक्षेमध्ये किमान 50 गुण प्राप्त होणारे उमेदवार "डाटा एंट्री ऑपरेटर्स " च्या पदावरील निवडीसाठी पात्र राहतील.

2. प्रात्यक्षिक परिक्षेत पात्र झालेल्या उमेदवारांची गुण क्रमानुसार यादी बनविण्यात येईल. सदर यादी बनविताना खालिलप्रमाणे गुण देण्यात येतील.

अ) उमेदवारास संगणक परिक्षेत मिळालेले गुण (100 पैकी)

ब) उमेदवार 10 वी मध्ये मिळालेल्या गुणांची टक्केवारी आणि इयत्ता 12 वी मध्ये मिळालेल्या गुणांची टक्केवारी यांची सरासरी काढण्यात येईल. त्यामध्ये उमेदवार पदवीधर असल्यास त्याला 10 गुण बोनस देण्यात येतील.

क) वरील अ व ब मधील गुणांची बेरीज करुन एकूण गुण देण्यात येतील व त्यानुसार उमेदवाराची निवड यादी प्रसिध्द करण्यात येईल. त्याचप्रमाणे तेवढयाच पुढील उमेदवारांची प्रतिक्षा यादी प्रसिध्द करण्यात येईल.

ड) सदर पदांसाठी मुलाखत घेण्यात येणार नाही.

**3) सूचना:-**

3.1. उमेदवारांनी विहीत नमुन्यात अलीकडच्या काळातील साक्षांकित पासपोर्ट साईज फोटोसह अर्ज सादर करावा. सदर अर्जाच्या पाकिटांवर शालेय पोषण आहार योजना - "डेटा एंट्री ऑपरेटर पदाकरीता अर्ज" असे नमूद करावे.

3.2. अर्जासोबत शैक्षणिक पात्रता,टंकलेखन (मराठी व इंग्रजी) पात्रता,संगणक ज्ञान पात्रता,वय,अनुभव इत्यादी संदर्भातील कागदपत्रांच्या साक्षाकिंत केलेल्या छायांकित प्रती जोडाव्यात.

3.3. अर्जासोबत उमेदवाराने र.रु.300/- चा मुख्य लेखा व वित्त अधिकारी,जि.प.रत्नागिरी यांचे नावे रत्नागिरी येथे देय असलेल्या राष्ट्रीयकृत बॅकेचा डिमांड ड्राप्ट दि. 18 / 07 /2018 रोजी सायंकाळी 5.00 पर्यंत शिक्षण विभाग(प्राथ.), जि.प.रत्नागिरी या ठिकाणी सादर करावा.

3.4. अर्जासोबत स्वत:चे पूर्ण नाव व पत्ता असलेला "4 X 6" आकाराचा,रु.5/- चे पोस्टाचे तिकीट लावलेला रिकामा लिफाफा पाठविण्यात यावा.

3.5.शिक्षण विभाग (प्राथमिक),जिल्हा परिषद रत्नागिरी कार्यालयातअर्ज सादर करावयाची अंतिम तारीख 18/07/2018 रोजी सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत असेल. कोणत्याही परिस्थितीत यानंतर आलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

3.6 .नियुक्ती पूर्वी उमेदवाराकडून शासनाकडील विहीत नमुन्यात करारनामा करुन घेण्यात येईल. तसेच नियुक्ती झालेल्या कर्मचा-यांना आपल्यावर कोणत्याही प्रकारचा गुन्हा व आरोप नसल्याचे प्रतिज्ञापत्र स्वतंत्रपणे सादर करावे लागेल. कंत्राटी पध्दतीने नियुक्ती केलेल्या डेटा एंट्री ऑपरेटर या पदासंबधी सेवा शर्ती, शैक्षणिक अर्हता,एकत्रित ठोक मानधन व नियुक्तीची कार्यपध्दती या संबधी आवश्यक ते सर्व बदल तसेच निर्णय घेण्याचे अंतिम अधिकार शासनास राहतील.

3.7. कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेल्या कर्मचा-यांची सेवा करारपत्रात नमूद केलेल्या कालावधीनंतर आपोआप संपुष्टात येईल.

3.8. डेटा एंट्री ऑपरेटर म्हणून नियुक्ती केलेल्या कंत्राटी पध्दतीच्या कर्मचा-यांस नियमित सेवेचे कोणतेही लाभ मिळणार नाही.

3.9. सदर पदांची भरती कंत्राटी पध्दतीने करावयाची असल्याने बिंदू नामावली प्रमाणे पदे भरण्याची आवश्यता नाही.

3.10. भरती प्रक्रियेसंदर्भात अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार जिल्हा निवड प्रक्रिया समिती जि.प. रत्नागिरी यांच्याकडे असेल.

3.11. सदर पदांबाबतचा अर्ज, नियुक्ती संदर्भातील अटी व शर्ती , मानधन, शैक्षणिक अर्हता इ. व अधिक माहिती www.ratnagiri.nic.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

(देवीदास कुलाळ)
सदस्य सचिव,
जिल्हा निवड प्रक्रिया समिती,
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद रत्नागिरी.

(आंचल गोयल)
अध्यक्ष,
जिल्हा निवड प्रक्रिया समिती,
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद रत्नागिरी.

**जिल्हा परिषद रत्नागिरी, शिक्षण विभाग (प्राथमिक)**
**शालेय पोषण आहार योजना- डेटा एन्ट्री ऑपरेटर पदा करीता अर्ज -2018**

अर्जाचा कार्यालयीन नोंदणी क्रमांक ______ दिनांक ______ (कार्यालयीन उपयोगासाठी)

प्रति,
मा.सदस्य सचिव,
जिल्हा निवड प्रक्रिया समिती,
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद रत्नागिरी.

उमेदवाराचा अलीकडील काळातील राजपत्रित अधिकारी यांनी सांक्षांकीत केलेला पासपोर्ट साईज फोटो

विषय : **शालेय पोषण आहार योजना सन 2018**
**डेटा एन्ट्री ऑपरेटर पदा करीता अर्ज.**

1) उमेदवारांचे नाव :- श्री/श्रीम.________________________________________
(आडनाव) (स्वत:चे नाव) (वडीलांचे/पतीचे नाव)

2) पत्रव्यवहाराचा पत्ता : ____________________________________________________
____________________________________________________
____________________________________________________

3) जन्मतारीख (शालान्त प्रमाणपत्रानुसार) ____________________________________________

4) वय (दिनांक 1/1/2018 रोजी) _______ वर्ष ________महिना _______ दिवस_____

5) अर्जदाराची शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता

| अ.क्र. | परीक्षेचे नाव | परीक्षा मंडळ/ विद्यापीठाचे नाव | उत्तीर्ण वर्ष | गुणांची टक्केवारी | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 10 वी | | | | |
| 2 | 12 वी | | | | |
| 3 | पदवी परीक्षा | | | | |
| 4 | मराठी टंकलेखन | | | | |
| 5 | इंग्रजी टंकलेखन | | | | |
| 6 | MSCIT/ केंद्र शासनाची या संदर्भातील तुल्यबल संगणकाची परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. | | | | |

**अनुभव**

| अ.क्र. | संस्थेचे नाव व पत्ता | धारण केलेले पद | सेवा कालावधी (पासून-पर्यंत) | एकूण सेवा |
|---|---|---|---|---|
| | | | | |

अर्जासोबत सादर केलेल्या प्रमाणपत्राच्या साक्षांकित छायांकित प्रती

1) ________________________ 2) ________________________

3) ________________________ 4) ________________________

5) ________________________ 6) ________________________

***प्रतिज्ञापत्र***

प्रमाणित करतो/करते की, सदर अर्जात सादर केलेली माहिती खरी आहे. सदर माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यामुळे माझी निवड रद्द झाल्यास माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

दिनांक :-

ठिकाण :- उमेदवाराची स्वाक्षरी

# जाहिर निवेदन

शालेय पोषण आहार योजनेकरीता जिल्हा परिषद रत्नागिरी अंतर्गत तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने एकत्रित मानधनावर रिक्त डेटा-एन्ट्री ऑपरेटरची पदे भरणेबाबत दि.03.07.2018 रोजी रत्नागिरी टाइम्स व प्रहार या दै.वृत्तपत्रात,गटशिक्षणाधिकारी,पंचायत समिती सर्व यांच्या नोटिस बोर्डावर व www.ratnagiri.nic.in या वेब साईडवर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

## भरती प्रक्रिया वेळापत्रक

| अ.क्र. | कालावधी | दिनांक |
|---|---|---|
| 1 | जाहिरात प्रसिध्द करणे | 03.07.2018 |
| 2 | अर्ज स्विकारण्याची अंतिम तारिख | 18.07.2018 |
| 3 | प्राप्त अर्जाचा छाननी कालावधी | 19.07.2018 व 20.07.2018 |
| 4 | यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | 23.07.2018 |
| 5 | प्रसिध्द यादी संदर्भात आक्षेप मागविणे दिनांक | 27.07.2018 |
| 6 | उमेदवारांची प्रात्यक्षिक परिक्षा दिनांक | 30.07.2018 |
| 7 | निवड यादी व प्रतिक्षा यादी जाहिर करण्याचा दिनांक. | 30.07.2018 |

शिक्षणाधिकारी(प्राथमिक)
जिल्हा परिषद रत्नागिरी